# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- १०१-२३** **दिनांक :- २९/०३/२०२३**

## घरफोडी करणा-या सराईत आरोपीताचा १० तासाच्या आत शोध घेवुन २३,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत - काशिमीरा पोलीस ठाणेची कामगिरी.

फिर्यादी नामे श्री. अकबरअली मोहम्मदअली चुडीहार, रा. रुम नं २०२, बि.नं ०६, डी.बी.ओझोन ठाकुर मॉलजवळ, काशिमीरा, मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे हे दिनांक २३/०३/२०२३ रोजी १२.०० वा. ते दिनांक २६/०३/२०२३ रोजी सायंकाळी १६.०० वा. चे दरम्यान रमजान उत्सवानिमित्त चंद्र दर्शनासाठी गोरेगाव, मुंबई येथे गेले असता त्यांचे राहते घराच्या खिडकीच्या ग्रीलचे दोन गज कापुन घरात प्रवेश करुन घरातील लाकडी तसेच लोखंडी कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले एकुण २९३ ग्रॅम वजनाचे १४,६५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने, एक किलो वजनाचे ७०,०००/- रुपये किंमतीचे चांदीचे दागिने व ०९,००,०००/- रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. २२५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७ ३८०, अन्वये दिनांक २६/०३/२०२३ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. संदीप कदम यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. श्री. प्रशांत गांगुर्डे यांना आदेशित केले होते. नमुद गुन्हयातील आरोपीच्या गुन्हे कार्यपध्दतीवरुन अश्याप्रकारचे गुन्हे करणारे ईसमांची माहिती घेतली असता गुप्तबातमीदारा मार्फत प्राप्त माहितीच्या अधारे आरोपीत नामे अब्दुल शेख ऊर्फ अब्दुल चिरा, वय ४६ वर्ष, रा. रुम नं २११, आदर्श निवास, अलकापुरी, आचोळा क्रॉसरोड, नालासोपारा, ता.वसई, जिल्हा- पालघर याने सदरचा गुन्हा केला असल्याचे व तो परराज्यात पळुन जाण्याच्या तयारी असल्याचे समजल्याने स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे व पथकाने नालासोपारा रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचुन वर नमुद आरोपीतास ताब्यात घेतले. सदर अटक आरोपीताकडुन गुन्हयातील चोरी केलेल्या रक्कमेपैकी ०७,७५,७००/- रोख रुपये हे जागीच हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच तपासादरम्यान चोरीस गेलेले २९३ ग्रॅम वजनाचे १४,६५,०००/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व ८५० ग्रॅम वजनाचे ७०,०००/- रुपये किंमतीचे चांदीचे दागिने असा एकुण २३,१०,०००/- रुपये किंमतीचा मुदेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

वर नमुद आरोपी हा अभिलेखावरील सराईत आरोपीत असुन त्याचेविरुध्द मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर राज्य-राजस्थान या परिसरात घरफोडीचे ४० हुन अधिक गुन्हे दाखल आहेत. आरोपीताने गुन्हा करतेवेळेस कोणताही तांत्रिक किंवा भौतीक पुरावा मागे न ठेवता गुन्हा केला होता परंतु त्याचे गुन्हा करण्याचे कार्यप्रणालीचे

अवलोकन व गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त माहितीचे आधारे काशिमीरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यानी गुन्हा दाखल झाल्यापासुन अवघ्या १० तासात अरोपीतास जेरबंद केले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप कदम, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, काशिमीरा पोलीस ठाणे, पो.नि. श्री.विजय पवार (गुन्हे), स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, पो.उप.नि. जावेद मुल्ला, प्रकाश कावरे, सागर साबळे, म.पो.उ.नि.अर्चना जाधव, स.फौ. अनिल पवार, पो.हवा.०६०३४ सचिन हुले, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, संतोष तायडे, रविंद्र कांबळे, पो.अंम. शरद नलावडे, प्रविण टोबरे तसेच पो.हवा. जयप्रकाश जाधव नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ१ यांनी केली आहे.



----०००----